महाराष्ट्र टाइम्स, कोल्हापूर ■ बुधवार, २६ ऑगस्ट २०१५

# शिवाजी विद्यापीठात 'रंगबहार'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

## महान कलाकाराला आदरांजली

'कलातपस्वी आबालाल रेहमान कलादालनाची उभारणी करण्यास शिवाजी विद्यापीठाने दिलेले सहकार्य ही या महान कलाकाराला वाहिलेली आदरांजली आहे,' अशी भावना कुलगुरू डॉ. शिंदे यांनी यावेळी व्यक्त केली.

कोल्हापूरच्या कलाक्षेत्रातील अग्रगण्य अशा 'रंगबहार' या संस्थेच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठात उभारण्यात आलेल्या कलातपस्वी आबालाल रेहमान कलादालनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ चित्रकार श्यामकांत जाधव होते. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या नूतन विस्तारित इमारतीमध्ये हा कार्यक्रम झाला. रंगबहारतर्फे विद्यापीठास समकालीन चित्रकारांच्या कुंचल्यातून साकारलेली सुमारे दीडशे दर्जेदार चित्रे प्रदान करण्यात आली आहेत. पहिल्या टप्प्यात सुमारे ५६ चित्रे कलादालनात प्रदर्शित करण्यात आली आहेत.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'काहीच दिवसांपूर्वी आबालाल रेहमान यांच्या काही कलाकृती मुंबईच्या जे.जे. कला संग्रहालयात पाहण्यात आल्या. तोपर्यंत त्यांच्याविषयी मी पूर्णतः अनभिज्ञ होतो. पण, त्यांच्या कलाकृती पाहिल्यानंतर त्यांच्या महानत्वाची प्रचिती आली. आपल्या कलाकृतीतून केवळ रंगरेषांचा खेळ न मांडता त्यापुढे जाऊन त्यांचा शरीरशास्त्राचा अभ्यास, तत्कालीन सामाजिक, आर्थिक स्थिती मांडण्याचे कौशल्य यांचा प्रत्यय येतो. कोल्हापूरच्या कलाक्षेत्राला वेगळी उंची मिळवून देण्याचे कार्य रेहमान यांनी केले.'



ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, 'इतिहास म्हणजे केवळ युद्धांचा, तहाचा किंवा राजघराण्यांची माहिती संकलन नव्हे; तर, त्याही पुढे जाऊन संपूर्ण परिसराचा भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय अशा बहुअंगांनी केलेला अभ्यास आहे. कोल्हापूरच्या कला, सांस्कृतिक या बाजूंवर प्रकाशझोत टाकणारा एक स्वतंत्र खंड निर्माण करण्याची योजना आहे. त्यामध्ये आबालाल रेहमान, बाबूराव पेंटर यांच्यासह अनेक महान कलातपस्वींच्या कार्याचा सविस्तर समावेश करण्यात येणार आहे.'

श्यामकांत जाधव म्हणाले, 'आबालाल रेहमान यांच्या कलागुणांची पारख राजर्षी शाहूंनी केली. रेहमान यांनी सुमारे वीस हजारांहून अधिक उत्तमोत्तम कलाकृती निर्माण केल्या. एका पिढीचे काम जणू त्यांनी एकट्याने उभे केले. याप्रसंगी 'रंगबहार'चे अध्यक्ष प्राचार्य अजेय दळवी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी आभार मानले. विजय टिपुगडे यांनी सूत्रसंचालन केले.